1179

1179
PRABHĀTAPHERĪCĪ rāṣṭrīya gītāvalī ! Āvṛtti 3 rī.
Mumbaī: B.P. Sāmanta, [1931?].
16 p. 14 cm.
Nationalistic songs.
NAI 1579
PP Mar B 28-29; PIB 72/21A-B

NATIONAL ARCHIVES

P/C 72/215

प्रभातफेरीची

राष्ट्रीय गीतावली !

SAMANT (B. P.)

लाठीगीत, गांधींची भूपाळी इ. इ.

आवृत्ति ३ री] [किं. १ आणा.

राष्ट्रसंतांना वंदन !

(चाल:—आनंदकंद—)

या वंदु राष्ट्रसंतां । त्या थोर भाग्यवंतां ॥ धृ० ॥
ते विश्ववंद्य गांधी । वंदू तयांस आधीं ॥
हरतील राष्ट्रव्याधी । माहिमा सदैव गातां ॥ १ ॥
ते नेहरू पिताश्री । लोळे पदीं स्वतां श्री ॥
गातां मुखें गुणश्री । येईल भाग्य हातां ॥ २ ॥
ज्योचा पिताच मोती । त्या काय होय कमती ॥
अर्पू जवाहिरा ती । ग्रणती सुभावयुक्ता ॥ ३ ॥
ते वल्लभी पटेल । महती जगा पटेल ॥
ज्याच्या हृदीं सखोल । दे शांतिला विधाता ॥ ४॥
मदनास लाजवोनी । मोहून टाकी अवनी ॥
त्या मालवीयजींनीं । वेडाविलें अनंता ॥ ५ ॥
या संतपंचकाला । वंदा हि गा यशाला ॥
हें वंद्य विश्वपाला । हो पूर्ण सौख्य दाता ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वन्दे मातरम्.

(राग—मिश्र खमाज, ताल—त्रिवट.)

वन्दे मातरम्
सुजलां सुफलां मलयजशीतलाम् ।
शस्यश्यामलां मातरम् ॥ वंदे० ॥
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीम् ।
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम् ॥
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम् ।
सुखदां वरदां मातरम् ॥ वंदे० ॥

लठीवाला !

(चाल—टोपीवाला पाहुणा.....)

टोपीवाला । आजि बनला लाठीवाला ॥ ध्रु० ॥
अस्सल धनिया विलायतेचा ।
कवडी दमडी करावयाचा ॥
धनि झाला हिंदुस्थानाचा ।
तागडीवाला । आजि बनला लाठीवाला ॥ १ ॥
फोडुनी झोडा तत्वा घरिलें ।
इंग्रजि राज्या स्थापित केलें ॥
नवे कायदे चालू केले ।
अंमल बसला । आजि बनला लाठीवाला ॥ २ ॥

कांचा देउनि माणिक नेलें ।
इंग्रज सगळे गब्बर केले ॥
हिंदी जन कासाविस झाले ।
जीव भुकेला । अजि बनला लाठीवाला ॥ ३ ॥
उडुनि गेली आतां माया ।
कळुनि आली इंग्रज किमया ॥
स्वातंत्र्याचें ध्येय बराया ।
जन हा सजला । आजि बनला लाठीवाला ॥ ४ ॥
गांधीजींनीं मंत्र कथियला ।
सत्य अहिंसा धर्म उद्देला ॥
भीति टाकुनि जन हा सजला ।
संग्रामाला । अजि बनला लाठीवाला ॥ ५ ॥
पाहुनि जनता जागृत झाली ।
बोबडी वनियाची हो वळली ॥
म्हणे कायहो करुं या वेळीं ।
कोणी बोला ! अजि बनला लाठीवाला ॥ ६ ॥
संतापानें चिडुन गेला ।
निःशस्त्रांना हाणित सुटला ॥
स्त्रियाकुलांचा भेद न उरला ।
बंधु बोला । अजि बनला लाठीवाला ॥ ७ ॥
बंधुभगिनींनों, ब्रीदा पाळा ।
मंगल सत्याचा जय बोला ॥
अनंतछंदी कवि गहिंवरला ।
प्रेमें धाला । आजि बनला लाठीवाला ॥ ८ ॥

वैष्णव जन त्या बोला !

(महात्माजींचे आवडतें पद.)

वैष्णव जन त्या बोला जन हो ।
दुःख परावें जो जाणे ।
परदुःखातें निवारी परि जो ।
चढे वृथा ना अभिमानें ॥ १ ॥

सकलां प्रेमें सदा वंदी जो ।
निंदा न करी कोणाची ॥
कायावाचामनें अंचल जो ।
धन्य धन्य जननी त्याची ॥ २ ॥

सुखदुःखीं समदृष्टी ठेवी ।
मानी माता परकांता ॥
असत्य भाषण विषसम मानी ।
कर्दम मानी परचित्ता ॥ ३ ॥

मायामोहां देत न थारा ।
वैराग्यातें जो सेवी ॥
रामनाम गर्जे प्रेमानें ।
ब्रह्मसमाधी जो लावी ॥ ४ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अंतरीं भक्ती कपट न चित्तीं ।
कामक्रोधा स्पर्शे ना ॥
नरसींदासा पंथ एक तो ।
वंदन भावें सच्चरणा ॥ ५ ॥

आर्यजनहो, मंत्र बोला !

आर्यजनहो, हाचि बोला मंत्र वंदे मातरम् ॥
गीतसुंदर श्रुतिमनोहर मंत्र वंदे मातरम् ॥ धृ० ॥
हिंदमाता दुःखिता हो पारतंत्र्यीं गांजली ॥
दुःखमोचन करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ १ ॥
भेदभावा जोर आला ऐक्य सारें लोपलें ॥
ऐक्यवर्धन करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ २ ॥
चित्तशुद्धी लोपता हो व्यसनिं जन हा गुंगला ॥
व्यसनवारण करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ३ ॥
शक्ती गेली युक्ति गेली दैन्य भारतिं मातलें ॥
दैन्यनाशा करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ४ ॥
मोहमाया परकियांची मानबुद्धी लोपनी ॥
दास्यबुद्धी नाशि ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ५ ॥
एक अंगुली हिंदमाता प्यारा प्राणाहुनि असे ॥
धन्य माता करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

चला रे शांतिसंगराला !

(चाल—चला रे गणराया वंदा.)

चला रे शांतिसंगराला ।
कारागृह तें साले आतां सत्याग्रहशाला ॥ धृ० ॥

नमूं या भारतमातेला ।
सकल सारखीं मुलें लाडकीं भेदभाव नुरला ॥ १ ॥

कोठला धर्मभेद उरला ।
राष्ट्रधर्मबंधन तें पाळुनी सुखवुं आर्यभूला ॥ २ ॥

टाकुं या परकी मालाला ।
घेऊं प्रेमें देशी वस्तू मोह सर्व गेला ॥ ३ ॥

कायदा सत्याचा पाळा ।
सत्यविरोधी इतर कायदे फोलाचि पाचोळा ॥ ४ ॥

धरोनी स्वाभिमानतेला ।
तुडवा पायीं गुलामवृत्ती सर्वनाश झाला ॥ ५ ॥

संकटीं शांतिनाद पाळा ।
नाहीं कसली भीति उरली हृदयिं मेरु ठेला ॥ ६ ॥

६

भूपाळी महात्मा गांधींची.

(चाल-घनश्यामसुंदरा श्रीधरा.)

घनश्याम गोजिरा गांधीजी कारागृहीं गेला ।
उठा लौकरी बंधुभगिनिनों चला संगराला ॥ धृ० ॥

जगांत कोणी नसे पाहिलें, युद्ध सुरू झालें ।
एक पक्ष सजला शस्त्रानें दुसरा शांतिबलें ॥
सत्य बोलणें सत्य चालणें सत्या आचरणें ।
सत्यशस्त्र घेवोनि करीं ते गांधी समरीं गेले ॥

चाल ॥ मनीं शांति धरणें सत्यता हेंचि ब्रीद पाहिलें ।
क्रोधवृत्ती गिळुनी पाहिजे चित्त शुद्ध केलें ।
तमासि जिंकाया सत्य तें पहा सिद्ध झालें ॥

चाल पू. उदयाचलिं फांकली प्रभा स्वातंत्र्यसूर्य आला ।
उठा लौकरी बंधुभगिनिनों, चला संगराला ॥ १ ॥

चक्र सुदर्शन श्रीविष्णूच्या करिं शोभे साचें ।
त्यानें गांधीकरीं घेतलें रूपचि चरखाचें ।।
शुभ्र सुंदरा खादी धापरा देशा उद्धारा ।
विलायती मालावरि घाला आज बहिष्कारा ॥

आज ॥ भेदभाव सोडा अनुसरा राष्ट्रिय धर्माला ।
सत्यव्रत घेवा दयेचा श्रेष्ठ धर्म पाळा ।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

चाल पू. धैर्य धरा चित्तीं घालवा नसत्या भीतीला ॥
उठा लौकरी बंधुभगिनिनों, चला संगराला ॥ २ ॥

हरहर महादेव बोला !

राष्ट्रीय झेंडा फडकत आला । हरहर महादेव बोला धृ०

सुंदर मूर्ती स्वातंत्र्याची झेंड्यानें वारेली ।
प्राणाहुनि हा प्यारा झेंडा त्याचा जय बोला ॥ १ ॥

भगवा झेंडा शिवप्रभूनें पूर्वी फडकविला ।
वीर धांवले रक्षायाला आठवा त्या काला ॥ २ ॥

सिंहप्रतापी प्रतापसिंहें झेंडा फडकविला ।
झेंडारक्षण करावयाला लाख वीर मेला ॥ ३ ॥

सत्यधर्म स्वीकारुनि आतां हीन वृत्ति सोडा ।
सत्यधैर्यवीर्याचा केला झेंडा हा अपुला ॥ ४ ॥

प्रभातकाली मंगलकाली वंदा झेंड्याला ।
शांतिसंगरा सिद्ध होउनी तारा देशाला ॥ ५ ॥

हरहर महादेव बोला !

NATIONAL ARCHIVES OF INDIA

८

घेऊं, स्वराज्य घेऊं !

(चरखा चला चलाके.)

चरखा फिरून फिरवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ धृ० ॥

नुरली मनांत भीती । सत्याग्रहीच प्रीती ।
श्रद्धा कसास लावूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ १ ॥

गाऊं स्वदेशगीतें । काढूं सुतास हातें ।
खॉदीच नित्य लेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ २ ॥

व्यापार सर्व गेला । परदेश पुष्ट झाला ।
आतां स्वदेशि सेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ३ ॥

जनताजनार्दनाला । या देशदेवतेला ।
सर्वस्व आज वाहूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ४ ॥

टिळकांनीं हेंच कथिलें । गांधीहि तेंच बोले ।
देशास नित्य ध्याऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ५ ॥

कवि हा अनंतछंदी । देशास नित्य वंदी ।
प्रेमें सुगीत गाऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

९

मातृभूमिवंदन.

(चाल—अयि मातृभूमि तेरे–)

हे मातृभूमि ! तुझिया चरणींच डोईं ठेऊं ।।
प्रेमें तुलाच माते ! सर्वस्व आज वाहूं ।। धृ० ।।

स्वर्गीय गंध तूंहि, स्वर्गीय पुष्प तूंहि ।।
स्वर्गीय गीत तूंहि, तव नाम एक गाऊं ।। १ ।।

ते लोकमान्य गांधी तव पुत्र थोर झाले ।
पदधूलि एक त्यांची शिरिं आपल्याचि लावूं ।। २ ।।

नच भेदभाव मानूं, राष्ट्रीय धर्म वानूं ।।
बांधूनि ऐक्यग्रंथी, प्रेमें स्वदेशि राहूं ।। ३ ।।

राष्ट्रीय गान गाऊं, राष्ट्रीय मान ठेऊं ।।
राष्ट्रीय ध्यान ध्याऊं, राष्ट्रीय ध्येय सेवूं ।। ४ ।।

वेदांत बंध आहे, हा हिंद देश पाहे ।।
त्यातें स्वतंत्र करुनी, जगतास शांति देऊं ।। ५ ।।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१०

तो विश्व गांधी !

(चाल—श्रीविश्ववंद्य गणराज.)

तो विश्ववंद्य गांधी । जाहला वंदी ॥ धृ ॥
शांतिबलानें भ्रांति घालवी । जग त्याला वंदी ।
जाहला वंदी ॥ १ ॥
वेडा म्हणातां वेडाचि लावी । गुंगे आनंदीं ।
जाहला वंदी ॥ २ ॥
सत्यचि बोले सत्यचि चाले । सत्याचा छंदी ।
जाहला वंदी ॥ ३ ॥
शत्रूलाहि मित्र लेखुनी । उतरवितो धुंदी ॥
जाहला वंदी ॥ ४ ॥
जगिं उपकारापुरता । कसला तो कैदी ॥
जाहला वंदी ॥ ५ ॥

हाच तो सत्याग्रही !

समरास सज्ज झाला । सत्याग्रही निघाला
मोहीम रोखुनीया

संग्राम झुंजण्याला । सत्याग्रही निघाला ॥ १ ॥
सामर्थ्य वर्धनोनी
जगतास चेतवोनी
काळाशीं खेळण्याला । सत्याग्रही निघाला ॥ २ ॥
सत्यासमान नाहीं
जगीं वंद्य अन्य कांहीं
पुरुषार्थ प्रेरण्याला । सत्याग्रही निघाला ॥ ३ ॥
श्रेष्ठांत श्रेष्ठ थोर
सेनानी क्रांतिकार
स्वातंत्र्य घोषणेला । सत्याग्रही निघाला ॥ ४ ॥
आध्यात्म योग भारे
विश्वास जो भरारे
स्वातंत्र्यसेवनाला । सत्याग्रही निघाला ॥ ५ ॥
योगींद्र जो महात्मा
जो हिंद देश आत्मा
थरकांपली जगाला । सत्याग्रही निघाला ॥ ६ ॥
यशवंत वीर माझा
निजगी करूनि काजा
हा आश्रमांत यावा । सत्याग्रही निघाला ॥ ७ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(चालः—माय विठाबाई० ॥)

झोंप कशी येई । उठ झणीं ॥ धृ० ॥

व्यसनी बनला देश भिकारी ।

अन्न न पोटभरी ॥ उठ० ॥ १ ॥

नकली वस्तू पैसा सारा ।

परदेशा नेई ॥ उठ० ॥ २ ॥

शौर्य लोपलें बुद्धी गेली ।

परदास्या पायीं ॥ उठ० ॥ ३ ॥

शोणित जाचा भारतमाता ।

काशि न दया येई ॥ उठ० ॥ ४ ॥

' मिलिंदमाधव '

नव हिंद राष्ट्र झेंडा । प्रणामा घे या ॥ धृ० ॥

हिंद भूमिच्या हिंदि जनांच्या । स्वाभिमान चिन्हा ॥ प्र० ॥

स्वराज्य माझें मीही त्याचा । जगता सांगाया ॥

स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरती । या फडफडणाऱ्या ॥

हिंदपुत्र हे सिद्ध तुझ्यासाठ । प्राणही अर्पाया ॥

नव्यामनूचे शिलेदार हे । नमिती तुजला या ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(चालः—पांडवा सम्राट० ॥)

बंधुभगिनीनो उठा या देश कार्यासी चला ।
दुष्ट ही साम्राज्यशाही धिःकरा झाणि हो तिला ॥ धृ० ॥

दास्यवेशीं ही तुम्हाला भ्रान यनवी सिंह हो ।
गुलामगिरिचे पाश तोडा मुक्त व्हा शुर वीर हो ॥ १ ॥

अमर झाले शूर, योद्धे, प्राण ज्यांनीं अर्पिले ।
तृणवत् गणुनी पंचप्राणा तंग युद्धीं धांवले ॥ २ ॥

देशकार्यीं प्राण अर्पायास आतां सिद्ध व्हा ।
मोक्ष मिळवायास साचा ' देशसेवा ' मार्ग हा ॥ ३ ॥

देश मारी हांक ओ द्या शुद्ध खादी वापरा ।
माल साचा जो स्वदेशी, नित्य छातीशीं धरा ॥ ४ ॥

गांधीजींचें ध्येय गांठा, कायदेभंगा करा ।
त्यजुनि सारी चैन आतां स्वार्थत्यागासो वरा ॥ ५ ॥

' शांती ' सेवा ' ऐक्य ' साधा ' अनत्याचारी ' बना ।
' देश माझा मी देशाचा ' मंत्र हाचो सर्वे म्हणा ॥ ६ ॥

' मिलिंद माधव '

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(चालः--मेरे भौलाबुला०)

देशा, आम्ही अतां, चल साह्य करूं ॥ धृ० ॥
राष्ट्रकार्यि गांधींजिनीं तनमन धन अर्पियलें ।
मनी त्यांसि स्मरूं ॥ चल० ॥ १ ॥

विभुति थोर, थोर जशा चालतात अग्निंतुनी ।
तयां अनुसरूं ॥ चल० ॥ २ ॥

परकियांस पोशियलें सोसुनी उपास अम्हीं ।
अतां बंद करूं ॥ चल० ॥ ३ ॥

हिंदमाय वंदिवान या पुढें न पाहुं कुणी ।
अजि मुक्त करूं ॥ चल० ॥ ४ ॥

(**'मिलिंद माधव'**)

धन्य गांधीजी तो रणगाजी धन्याचि नेहरूजी ।
प्रेमें आजि स्वातंत्र्याचा पोवाडा गाजी ॥
गांधी नेहरू लढति मिठागरीं स्वातंत्र्यासाठीं ।
लढतां लढतां दोघे पडले शत्रूंच्या हातीं ॥
खादी चरखा व्यसने सोडा स्वातंत्र्या गांठा ।
दारू सोडा कां पितां तो नरकाचा सांठा ॥
उठा मर्द हो प्रभातकालीं निश्चय हाच करा ।
ध्येया गांठा स्वातंत्र्याच्या देशा उद्धारा ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

येरवड्याला चला !

(चाल:—उठा बंधुनों, उठा भगिनिनों.)

येरवडा हें क्षेत्र मजेचें चला पहायाला ।
तेथें गांधी देव शोभला वंदूं या त्याला ॥ १ ॥
जुवळी ज्याच्या पुण्यग्राम तें शोभत थाटानें ।
पुण्यनाम ज्याचें गाजविलें टिळक लोकमान्यें ॥ २ ॥
प्रयागक्षेत्रीं जैशा वाहति गंगा आणि यमुना ।
मुळा मुठा त्या पावन सरिता वाढविती महिमा ॥३॥
भीती पडली ब्युराक्रसीला पुण्य क्षेत्राची ॥
त्यांनीं केली बंदीशाला चोरांचिलटांची ॥ ४ ॥
परी गांधीजी गेले आतां त्या येरवड्याला ॥
बंदीशाला केली त्यांनीं सत्याग्रहशाला ॥ ५ ॥
राष्ट्रभक्त जे मिळुनु पाहति स्वराज्यमोक्षाला ॥
त्यांनीं जावें तपा कराया त्या येरवड्याला ॥ ६ ॥
अनेक गेले तपोनिधी ते जातिल आणिकही ॥
काय वर्णु महती क्षेत्राची कुंठित मति होई ॥ ७ ॥
तिथें गांधिजी देवस्वरूपें दिसतील बसलेले ।
चला बंधुनों, चला भगिनिनों, या मंगल वेले ॥८॥
येरवडा हें क्षेत्र गाजलें, चला पहायाला ॥
गुलामगिरिच्या पाया खणु, मिळवुं स्वराज्याला ॥९॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

महात्मा गांधींची आरती.

—:0:—

जयदेव जयदेव जय गांधीराया ।
खादी ही अवतरली देशा तारावया ॥ धृ० ॥
तुझिया हातीं शोभे चरखा सुंदरसा ।
गरगर फिरुनी मंगल ध्वनि काढी खासा ॥ १ ॥
चरखा नोहे वाटे चक्र सुदर्शन ।
दर्शन सुखकर देईल स्वराज्य आणून ॥ २ ॥
वापरुनीयां खादी देशा उद्धारा ।
स्वातंत्र्या मेळवुनी सुखवा जन सारा ॥ ३ ॥
खादी पवित्र आहे गांधीजी बोले ।
बोले तैसा चाले वंदा पाऊलें ॥ ४ ॥
खादी पुराण वाचा मंगल भावानें ।
भाना देव मुकेला गा खादीस्तवनें । ५ ॥
जयदेव जयदेव जय गांधीराया ।
खादी ही अवतरली देशा तारावया ॥ ६ ॥

उत्तिष्ठ !

(चालः—परवशता पाश० ॥)

देशाची हांक आली । आतां उठा बंधुनो ॥धृ० ॥

बहिष्कार घाला सोडा ।
माल तो विदेशी ॥ आतां० ॥
सुलभ मार्ग स्वातंत्र्याचा ।
दुष्ट कानू मोडा ॥ आतां० ॥
राष्ट्रधर्म स्मरुनी चाला ।
शांतिसंगराला ॥ आतां० ॥
अतुल शौर्य आतां अपुलें ।
प्रगट होऊं द्याना ॥ आतां० ॥
दुष्ट बुरुज दास्यत्वाचा ।
खिंड त्यास पाडा ॥ आतां० ॥
सहनशीलता हो अपुली ।
दाखवा जगाला ॥ आतां० ॥

'मिलिंदमाधव'

NATIONAL ARCHIVES OF INDIA

हिंदमातेची लाडकी कन्या !

श्रीमती सौ. कमलादेवी.

मुद्रक:—वृ. ना. चव्हाण, मराठा प्रिंटिंग प्रेस,
लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७.
प्रकाशक:—भा. पां. सामंत, कॉंट्रॅक्टर बिल्डिंग
गिरगांव, मुंबई.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

P15 72/21

IMPERIAL LIBRARY
RECEIVED
2 NOV 1930

राष्ट्रीय गीतावली !

SAMANT P. K.

लाठीगीत, गांधींची भूपाळी इ. इ.

आवृत्ति २ री] [किं. १ आणा.

(36)

राष्ट्रसंतांना वंदन !

(चाल:—आनंदकंद—)

या वंदुं राष्ट्रसंतां । त्या थोर भाग्यवंतां ॥ धृ० ॥

ते विश्ववंद्य गांधी । वंदूं तयांस आधीं ॥

हरतील राष्ट्रव्याधीं । माहिमा सदैव गातां ॥ १ ॥

ते नेहरू पिताश्री । लोळे पदीं स्वतां श्री ॥

गातां मुखें गुणश्री । येईल भाग्य हातां ॥ २ ॥

ज्याचा पिताच मोती । त्या काय होय कमती ॥

अर्पू जवाहिरा ती । प्रणती सुभावयुक्ता ॥ ३ ॥

ते वल्लभी पटेल । महती जगा पटेल ॥

ज्याच्या हृदीं सखोल । दे शांतिला विधाता ॥ ४॥

मदनास लाजवोनी । मोहून टाकी अवनी ॥

त्या मालवीयजींनीं । वेडाविलें अनंता ॥ ५ ॥

या संतपंचकाला । वंदा हि गा यशाला ॥

हे वंद्य विश्वपाला । हो पूर्ण सौख्य दाता ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वन्दे मातरम्.

(राग—मिश्र काफी, ताल–त्रिवट.)

वन्दे मातरम्
सुजलां सुफलां मलयजशीतलाम् ।
शस्यश्यामलां मातरम् ॥ वंदे० ॥
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीम् ।
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम् ॥
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम् ।
सुखदां वरदां मातरम ॥ वंदे० ॥

लाठीवाला !

(चाल—टोपीवाला पाहुणा.....)

टोपीवाला । अजि बनला लाठीवाला ॥ ध्रु० ॥
अस्सल बनिया विलायतेचा ।
कवडी दमडी कराव्ययाचा ॥
धनि झाला हिंदुस्थ नाचा ।
लागडीवाला । आजे बनला लाठीवाला ॥ १ ॥
फोडुनी झोडा लत्ता धरिलें ।
इंग्रजि राज्य। स्थापित केलें ॥
नवे कायदे चालू केले ।
अंमल बसला । आजि बनला लाठीवाला ॥ २ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कांचा देउनि माणिक नेलें ।
इंग्रज सगळे गब्बर केले ॥
हिंदी जन कासाविस झाले ।
जीव भुकेला । आजि बनला लाठीवाला ॥ ३ ॥
उडुनि गेली आतां माया ।
कल्लानि आली इंग्रज किमया ॥
स्वातंत्र्याचें ध्येय धराया ।
जन हा सजला । आजि बनला लाठीवाला ॥ ४ ॥
गांधीजींनीं मंत्र कथियला ।
सत्य अहिंसा धर्म उद्देला ॥
भीति टाकुनि जन हा सजला ।
संग्रामाला । आजि बनला लाठीवाला ॥ ५ ॥
पाहुनि जनता जागृत झाली ।
बोबडी वनियाची हो वळली ॥
म्हणे कायहो करुं या वेळीं ।
कोणी बोला ! आजि बनला लाठीवाला ॥ ६ ॥
संतापानें चिडून गेला ।
निःशस्त्रांना हाणित सुटला ॥
स्त्रियापुरुषांचा भेद न उरला ।
बंधु बोला । आजि बनला लाठीवाला ॥ ७ ॥
अंधुमागिनीलीं, ब्रिदा पाळा ।
मंगल सत्याचा जय बोला ॥
अनंतछंदी कवि गहिंवरला ।
प्रेमें धाला । आजि बनला लाठीवाला ॥ ८ ॥

वैष्णव जन त्या बोला !

(महात्माजींचे आवडते पद.)

वैष्णव जन त्या बोला जन हो ।
दुःख परावें जो जाणे ॥
परदुःखातें निवारी परि जो ।
चढे वृथा ना अभिमानें ॥ १ ॥

सकलां प्रेमें सदा वंदी जो ।
निंदा न करी कोणाची ॥
कायावाचामनें अचल जो ।
धन्य धन्य जननी त्याची ॥ २ ॥

सुखदुःखीं समदृष्टी ठेवी ।
मानी माता परकांता ॥

असत्य भाषण विषसम मानी ।
कर्दम मानी परवित्ता ॥ ३ ॥

मायामोहां देत न थारा ।
वैराग्यातें जो सेवी ॥

रामनाम गर्जे प्रेमानें ।
ब्रह्मसमाधी जो लावी ॥ ४ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अंतरिं मकी कपट न चित्तीं ।
कामक्रोधा स्पर्शे ना ॥
नरसींदासा पंथ एक तो ।
वंदन भावें तच्चरणा ॥ ५ ॥

आर्यजनहो, मंत्र बोला !

आर्यजनहो, छाचि बोला मंत्र वंदे मातरम् ॥
गीतसुंदर श्रुतिमनोहर मंत्र वंदे मातरम् ॥ धृ० ॥
छिदमाता दुःखिता हो पारतंत्र्यीं गांजली ॥
दुःखमोचन करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ १ ॥
भेदभावा जोर आला ऐक्य सारें लोपलें ॥
ऐक्यवर्धन करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ २ ॥
चित्तशुद्धी लोपता हो व्यसनिं जन हा गुंगला ॥
व्यसनवारण करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ३ ॥
शक्ती गेली युक्ति गेली दैन्य भारतिं मातलें ॥
दैन्यनाशा करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ४ ॥
मोहमाया परकियांची मानबुद्धी लोपवी ॥
स्वास्थवृत्ती नांदि ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ५ ॥
एक अंगुली छिदमाता प्यारी प्राणाहुनि असे ॥
धन्य माता करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

चला रे शांतिसंगराला !

(चाल–चला रे गणराया वंदा.)

चला रे शांतिसंगराला ।
कारागृह तें झालें आतां सत्याग्रहशाला ॥ धृ० ॥

नमूं या भारतमातेला ।
सकल सारखीं मुलें लाडकीं भेदभाव नुरला ॥ १ ॥

कोठला धर्मभेद उरला ।
राष्ट्रधर्मबंधन तें पाळुनी सुखपुं आर्यभूला ॥ २ ॥

टाकुं या परकी मालाला ।
घेऊं प्रेमें देशी वस्तू मोह सर्व गेला ॥ ३ ॥

कायदा सत्याचा पाळा ।
सत्यविरोधी इतर कायदे फोलाचे पाचोळा ॥ ४ ॥

धरोनी स्वाभिमानतेला ।
तुडवा पायीं गुलामवृत्ती सर्वनाश झाला ॥ ५ ॥

संकटीं शांतिबोध पाळा ।
नाहीं कसली भीति उरली दुर्बांधे मेरु ठेला ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

भूपाळी महात्मा गांधींची.

(चाल-घनश्यामसुंदरा श्रीधरा.)

घनश्याम गोजिरा गांधीजो कारागृहीं गेला ।
उठा लौकरी बंधुभागिनिनों चला संगराला ॥ धृ० ॥
जगांत कोणी नसे पाहिलें, युद्ध सुरू झालें ।
एक पक्ष सजला शस्त्रानें दुसरा शांतिबलें ॥
सत्य बोलणें सत्य चालणें सत्या आचरणें ।
सत्यशस्त्र घेवोनि करीं ते गांधी समरीं गेले ॥

चाल॥ मनीं शांति धरणें मृदुता हेंचि बोध पाहिलें ।
क्रोधवृत्ती गिळुनी पाहिजे चित्त शुद्ध केलें ।
तमासि जिंकाया सत्य तें पहा सिद्ध झालें ॥

चाल पू. उदयाचलिं फांकली प्रभा खातंत्र्यसूर्य आला ।
उठा लौकरी बंधुभागिनेनों, चला संगराला ॥ १ ॥
चक्र सुदर्शन श्रीविष्णूच्या करिं शोभे साचें ।
त्यानें गांधीकरीं घेतलें रूपाचे चरख्याचें ॥
शुभ्र सुंदरा खादी वापरा देशा उद्धारा ।
विलायती मालावरि घाला आज बहिष्कारा ॥

चाल॥ भेदभाव सोडा अनुसरा राष्ट्रिय धर्माला ।
सत्यव्रत सेवा दयेचा श्रेष्ठ धर्म पाळा ।
स्वराज्य नालोनी येईलहिं तुमच्या देशाला ।

चाल पू. धैर्य धरा चित्तीं घालवा नसत्या भीतीला ॥
उठा लौकरी बंधुभगिनिनों, चला मंगराला ॥ २ ॥

हरहर महादेव बोला !

राष्ट्रीय झेंडा फडकत आला । हरहर महादेव बोला धृ०

सुंदर मूर्ती स्वातंत्र्याची झेंड्यानें वरिली ।
प्राणाहुनि हा प्यारा झेंडा त्याचा जय बोला ॥ १ ।

भगवा झेंडा शिवप्रभूनें पूर्वी फडकविला ।
वीर धांवले रक्षायाला आठवा त्या काला ॥ २ ॥

सिंहप्रतापी प्रतापसिंहें झेंडा फडकविला ।
झेंडारक्षण करावयाला लाख वीर मेळा ॥ ३ ॥

सत्यधर्म स्वीकारुनि आतां हीन वृत्ति सोडा ।
सत्यधैर्यवीर्याचा केला झेंडा हा अपुला ॥ ४ ॥

प्रभातकाली मंगलकाली वंदा झेंड्याला ।
शांतिसंगरा सिद्ध होउनी तारा देशाला ॥ ५ ।

हरहर महादेव बोला !

NATIONAL ARCHIVES OF INDIA

८

घेऊं, स्वराज्य घेऊं !

(चरखा चला चलाके.)

चरखा फिरून फिरवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ धृ० ॥

नुरली मनांत भीती । सत्यावरीच प्रीती ।
श्रद्धा कसास लावूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ १ ॥

गाऊं स्वदेशगीतें । कांहूं सुतास हातें ।
खादीच नित्य लेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ २ ॥

व्यापार सर्व गेला । परदेश पुष्ट झाला ।
आतां स्वदेशि सेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ३ ॥

जनताजनार्दनाला । या देशदेवतेला ।
सर्वस्व आज वाहूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ४ ॥

टिळकांनीं हेंच कथिलें । गांधीहि तेंच बोले ।
देशास नित्य ध्याऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ५ ॥

कवि हा अनंतछंदी । देशास नित्य वंदी ।
प्रेमें सुगीत गाऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मातृभूमिवंदन.

(चाल—अयि मातृभूमि तेरे—)

हे मातृभूमि ! तुझिया चरणींच डोईं ठेऊं ।।
प्रेमें तुलाच माते ! सर्वस्व आज वाहूं ।। धृ० ।।

स्वर्गीय गंध तूंहि, स्वर्गीय पुष्प तूंहि ।।
स्वर्गीय गीत तूंहि, तव नाम एक गाऊं ।। १ ।।

ते लोकमान्य गांधी तव पुत्र थोर झाले ।
पदधूलि एक त्यांची शिरिं आपल्याचि लाहूं ।। २ ।।

नच भेदभाव मानूं, राष्ट्रीय धर्म वानूं ।।
बांधूनि ऐक्यग्रंथी, प्रेमें स्वदेशि राहूं ।। ३ ।।

राष्ट्रीय गान गाऊं, राष्ट्रीय मान ठेऊं ।।
राष्ट्रीय ध्यान ध्याऊं, राष्ट्रीय ध्येय सेवूं ।। ४ ।।

बंधांत बंद्य आहे, हा हिंद देश पाहें ।।
त्यातें स्वतंत्र करुनी, जगतास शांति देऊं ।। ५ ।।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१०

तो विश्व गांधी !

(चाल—श्रीविश्ववंद्य गणराज.)

तो विश्ववंद्य गांधी । जाहला वंदी ॥ धृ ॥
शांतिबलानें भ्रांति घालवी । जग त्याला वंदी ।
जाहला वंदी ॥ १ ॥
वेडा म्हणतां वेडचि लावी । गुंगे आनंदीं ।
जाहला वंदी ॥ २ ॥
सत्याचि बोले सत्यचि चाले । सत्याचा छंदी ।
जाहला वंदी ॥ ३ ॥
शत्रूलाहि मित्र लेखुनी । उतरवितो धुंदी ॥
जाहला वंदी ॥ ४ ॥
जगिं उपकारापुरता । कसला तो कैदी ॥
जाहला वंदी ॥ ५ ॥

हाच तो सत्याग्रही !

समरास सज्ज झाला । सत्याग्रही निघाला
मोहीम रोखुनीया
रणशूर पेऊनीया

NATIONAL ARCHIVES OF INDIA

संग्राम झुंजण्याला । सत्याग्रही निघाला ॥ १ ॥
सामर्थ्य वर्धवोनी
जगतास चेतवोनी
काळाशीं खेळण्याला । सत्याग्रही निघाला ॥ २ ॥
सत्यासमान नाही
जगीं वंद्य अन्य कांही
पुरुषार्थ प्रेरण्याला । सत्याग्रही निघाला ॥ ३ ॥
श्रेष्ठांत श्रेष्ठ थोर
सेनानी क्रांतिकार
स्वातंत्र्य घोषणेला । सत्याग्रही निघाला ॥ ४ ॥
आध्यात्म योग भारे
विश्वास जो भरारे
स्वातंत्र्यसेवनाला । सत्याग्रही निघाला ॥ ५ ॥
योगींद्र तो महात्मा
जो हिंद देश आत्मा
थरकांपवी जगाला । सत्याग्रही निघाला ॥ ६ ॥
यशवंत वीर माझा
विजयी करूनि काजा
हा आश्रमांत यावा । सत्याग्रही निघाला ॥ ७ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(चालः—माय विठाबाई० ॥)

झोंप कशी येई । उठ झणीं ॥ धृ० ॥

व्यसनी बनला देश भिकारी ।

अन्न न पोटभरी ॥ उठ० ॥ १ ॥

नकली वस्तू पैसा सारा ।

परदेशा नेई ॥ उठ० ॥ २ ॥

शौर्य लोपलें बुद्धी गेली ।

परदास्या पायीं ॥ उठ० ॥ ३ ॥

शोशित जाचा भारतमाता ।

काशि न दया येई ॥ उठ० ॥ ४ ॥

' मिलिंदमाधव '

नव हिंद राष्ट्र झेंडा । प्रणामा घे या ॥ धृ० ॥

हिंद भूमिच्या हिंदि जनांच्या । स्वाभिमान चिन्हा ॥ प्र० ॥

स्वराज्य माझें मोही त्याचा । जगता सांगाया ॥

स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरती । या फडफडणाऱ्या ॥

हिंदपुत्र हे सिद्ध तुझ्यास्तव । प्राणही अर्पाया ॥

नव्यामनूचे शिलेदार हे । नमिती तुजला या ॥

(चालः—पांडवा सम्राट० ॥)

बंधुभगिनीनो उठा या देश कार्यासी चला ।
दुष्ट ही साम्राज्यशाही धिःकरा झणि हो तिला ॥ धृ० ॥

दास्यदेशीं ही तुम्हाला श्वान मनवी सिद्ध हो ।
गुलामगिरिचे पाश तोडा मुक्त व्हा शुर वीर हो ॥ १ ॥

अमर झाले शूर, योद्धे, प्राण ज्यांनीं अर्पिले ।
तृणवत् गणुनी पंचप्राणा तंग युद्धीं धांवले ॥ २ ॥

देशकार्यीं प्राण अर्पायास आतां सिद्ध व्हा ।
मोक्ष मिळवायास सोपा ' देशसेवा ' मार्ग हा ॥ ३ ॥

देश मारी हांक ओ घ्या शुद्ध खादी वापरा ।
माल साचा जो स्वदेशी, नित्य छातीशीं धरा ॥ ४ ॥

गांधीजींचें ध्येय गांठा, कायदेभंगा करा ।
त्यजुनि सारी चैन आतां स्वार्थत्यागासी वरा ॥ ५ ॥

' शांती ' सेवा ' ऐक्य ' साधा ' अनत्याचारी ' बना ।
' देश माझा मी देशाचा ' मंत्र हाचा मुखें म्हणा ॥ ६ ॥

' मिलिंद माधव '

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(चाल:--मेरे मौलाबुला०)

देशा, आम्हीं अतां, चल साह्य करूं ॥ धृ० ॥
राष्ट्रकार्यें गांधींजिनीं तनमन धन अर्पियलें ।
मनी त्यांसि स्मरूं ॥ चल० ॥ १ ॥

विभुति थोर, थोर जशा चालतात अग्नितुनी ।
त्यां अनुसरूं ॥ चल० ॥ २ ॥

परकियांस पोशियलें सोसुनी उपास अम्हीं ।
अंतां बंद करूं ॥ चल० ॥ ३ ॥

हिंदमाय वंदिवान या पुढें न पाहुं कुणी ।
अजि मुक्त करूं ॥ चल० ॥ ४ ॥

('मिलिंद माधव')

धन्य गांधीजी तो रणगाजी धन्याचि नेहरूजी ।
प्रेमें आजि स्वातंत्र्याचा पोवाडा गाजी ॥
गांधी नेहरू लढति मिठागरीं स्वातंत्र्यासाठीं ।
लढतां लढतां दोघे पडले शत्रूंच्या हातीं ॥
खादी चापरा व्यसने सोडा स्वातंत्र्या गांठा ।
दारू सोडा कां पितां तो नरकाचा सांठा ॥
उठा मर्द हो प्रभातकालीं निश्चय हाच करा ।
ध्येया गांठा स्वातंत्र्याच्या देशा उद्धारा ॥

येरवड्याला चला !

(चाल:-उठा बंधुनों, उठा भगिनिनों.)

येरवडा हें क्षेत्र मजेचें चलो पहायाला ।
तेथें गांधी देव शोभला वंदूं या त्याला ॥ १ ॥

जवळी ज्याच्या पुण्यग्राम तें शोभत थाटानें ।
पुण्यनाम ज्याचें गाजविलें टिळक लोकमान्यें ॥ २ ॥

प्रयागक्षेत्रीं जैशा वाहति गंगा आणि यमुना ।
मुळा मुठा त्या पावन सरिता वाढविती महिमा ॥३॥

भीती पडली ब्युराक्रसीला पुण्य क्षेत्राची ॥
त्यांनीं केली चंदीशाला चोरांचिलटांची ॥ ४ ॥

परी गांधीजी गेले आतां त्या येरवड्याला ॥
चंदीशाला केली त्यांनी सत्याग्रहशाला ॥ ५ ॥

राष्ट्रभक्त जे मिळतु पाहति स्वराज्यमोक्षाला ॥
त्यांनीं जावें तपा करायया त्या येरवड्याला ॥ ६ ॥

अनेक गेले तपोनिधी ते जातिल आणिकही ॥
काय वर्णु महती क्षेत्राची कुंठित मति होई ॥ ७ ॥

तिथें गांधिजी देवस्वरूपें दिसतील वसलेले ।
चला बंधुनों, चला भगिनिनों, या मंगल वेळे ॥८॥

येरवडा हें क्षेत्र गाजलें, चला पहायाला ॥
गुलामगिरिच्या पापा खंडूं, मिळवु स्वराज्याला ॥९॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

महात्मा गांधींची आरती.

—:0:—

जयदेव जयदेव जय गांधीराया ।
खादी ही अवतरली देशा तारावया ॥ धृ० ॥
तुझिया हातीं शोभे चरखा सुंदरसा ।
गरगर फिरुनी मंगल ध्वनि काढी खासा ॥ १ ॥
चरखा नोहे वाटे चक्र सुदर्शन ।
दर्शन सुखकर देईल स्वराज्य आणून ॥ २ ॥
वापरुनीयां खादी देशा उद्धारा ।
स्वातंत्र्या मेळवुनी सुखवा जन सारा ॥ ३ ॥
खादी पवित्र आहे गांधीजी बोले ।
बोले तैसा चाले वंदा पाऊलें ॥ ४ ॥
खादी पुराण वाचा मंगल भावानें ।
भावा देव मुकेला गा खादीस्तवनें । ५ ॥
जयदेव जयदेव जय गांधीराया ।
खादी ही अवतरली देशा तारावया ॥ ६ ॥

उत्तिष्ठ !

(चालः—परवशता पाश० ॥)

देशाची हांक आली । आतां उठा बंधुनो ॥धृ० ॥

बहिष्कार घाला सोडा ।
माल तो विदेशी ॥ आतां० ॥
सुलभ मार्ग स्वातंत्र्याचा ।
दुष्ट कानू मोडा ॥ आतां० ॥
राष्ट्रधर्म स्मरुनी चाला ।
शांतिसंगराला ॥ आतां० ॥
अतुल शौर्य आतां अपुलें ।
प्रगट होऊं द्याना ॥ आतां० ॥
दुष्ट बुरुज दास्यत्वाचा ।
खिंड त्यास पाडा ॥ आतां० ॥
सहनशीलता हो अपुली ।
दाखवा जगाला ॥ आतां० ॥

'मिलिंदमाधव'

NATIONAL ARCHIVES OF INDIA

हिंदमातेची लाडकी कन्या !

श्रीमती सौ. कमलादेवी.

मुद्रक:—वु. ना. घर्दे, मराठा प्रिंटिंग प्रेस,
लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७.
प्रकाशक:—भा. पां. सामंत, कॉंट्रॅक्टर बिल्डिंग
गिरगांव, मुंबई.

NATIONAL ARCHIVES OF INDIA